मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०६ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • जून-२०२३



# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०६ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • जून-२०२३

**बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
**राजेंद्र थोरात**
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
**संजय तु. जालगांवकर • राजनंदन कृ. पिंपळकर**
**श्रीकांत द. पाटील • रोहित कि. खुडे**

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता

५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४

E-mail : hduniya.marathi@nirankari.org
marathihastiduniya@gmail.com

Website : www.nirankari.org


लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

सदस्यता शुल्क

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- कुतूहल २३
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- आरोग्याचा मंत्र ३५
- सामान्य ज्ञान ४७
- रंग भरा ५०


## चित्रकथा


- चित्रकथा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- विशेष - आंतरराष्ट्रीय योग दिन ०८
- आला पाऊस, सावध राहा १५
- संतकथा २१
- भ्रमंती - २८
- स्वामी विवेकानंद : प्रेरक प्रसंग ३२
- विशेष - सेवा पुरस्कार ४२-४३
- विशेष - जागतिक पर्यावरण दिन ४५
- १०-१२ वी नंतर प्रवेश घेतांना...... ४८








## कथा


- श्रीरामांच्या अवतारकार्याची .... ०५
- दक्षिणा ०९
- प्रभूइच्छेने घडे सकळ २०
- झाकली मूठ सव्वा लाखाची २४
- आशेचा दीपक ३४








## कविता


- जेष्ठाची चाहूल १२
- निसर्गाची शिकवण ३६
- डोळे उघडून बघा ३७

# कार्यावर दृढ निष्ठा असावी

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सर्व बालमित्रांना खूप खूप शुभेच्छा! मागील वर्षाचा यश-अपयशाचा आलेख पाहता आता आपल्याला नव्या उमेदीनं वाटचाल करायची आहे. स्वामी विवेकानंदांचं ते वाक्य लक्षात आहे ना! त्यांनी म्हटलंय -उठा! जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका. हे तत्त्व ज्यांनी ज्यांनी अंगीकारलं, त्यांनी कठीण परिस्थितीतही यश खेचून आणलं.

मित्रांनो, लुई पाश्चर या शास्त्रज्ञाचं नाव तुम्ही ऐकलंच असेल. फ्रान्समध्ये जन्माला आलेल्या या शास्त्रज्ञानं असा शोध लावला, की बाहेरील जंतू जेव्हा शरीरात प्रवेश करतात तेव्हा शरीराला रोग होतो; परंतु त्याच रोगाच्या जंतूंची सौम्य लस त्या रोग्याला दिली तर त्याच रोगाचं निवारणही करता येतं. हा महत्त्वपूर्ण शोध लावण्यासाठी त्याच्याकडे होती अपार इच्छाशक्ती, धैर्य आणि चिकाटी!

एकदा काय झालं, लुईचं लग्न ठरलं. मुहूर्तही ठरला.१२ जून लग्नाची तारीख ठरली. त्याप्रमाणे नववधू मेरी पूर्ण तयारीनिशी चर्चमध्ये येऊन बसली होती. सर्व पाहुणेमंडळी उपस्थित झाली. आता फक्त वराच्या म्हणजे लुईच्या आगमनाची प्रतीक्षा सर्वांना होती. बराच वेळ झाला तरी लुई विवाहाच्या ठिकाणी उपस्थित झाला नाही. तो मेकअप करत असावा असं सर्वांना वाटलं; परंतु तिथेही त्याला शोधलं. तो कुठेही सापडला नाही. सर्वांचे चेहरे चिंताग्रस्त झाले. लुईच्या मित्राला संशय आला, की त्याला शोधायचं असेल तर एकच ठिकाण आहे, ते म्हणजे प्रयोगशाळा! तो तडक प्रयोगशाळेत गेला. अपेक्षेप्रमाणे लुई तिथे प्रयोग करण्यात दंग होता. मित्र म्हणाला, अरे! आज तुझ्या जीवनातला किती महत्त्वाचा दिवस आहे , तुझ्या लग्नाची तयारी झाली आहे. सर्वजण तिथे खोळंबले आहेत आणि तू इथं काय करतोयस? आज तुझं लग्न आहे हे विसरलास की काय? लुई म्हणाला, विसरेन कसा! परंतु आधी मला हे महत्त्वाचं कार्य पूर्ण करु दे. लग्न काय होणारच आहे; पण त्यासाठी माझा हा प्रयोग अर्धवट का सोडू? आता हा प्रयोग अंतिम टप्प्यात आलाय, असे म्हणून त्याने आपलं काम पूर्ण केलं आणि मगच तो लग्नाला उभा राहिला.

खरंच, आपल्या कार्यावर जर अशी दृढ निष्ठा असेल तर अलौकिक कार्ये का घडून येणार नाहीत!

- राजेंद्र थोरात



पौराणिक कथासार

# श्रीरामांच्या अवतारकार्याची समाप्ती

प्रभू रामचंद्रांनी अयोध्येवर दहा हजार वर्षे राज्य केले असे पुराणात म्हटले आहे. प्रभूंना आपले अवतार कार्य संपवून वैकुंठात परत आणणे आवश्यक होते. सर्व देव यमराजाकडे गेले; परंतु यमाने हे कार्य करण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला. जोपर्यंत हनुमंत अयोध्येत आहेत तोपर्यंत मी त्या नगरीत जाऊ शकत नाही असे सांगितले. शेवटी सर्व देवांनी ही जबाबदारी काळावर सोपवली. काळाने ती मान्य केली.

काळालाही हनुमंताची भीती होतीच, म्हणून त्याने साधूचा वेष घेतला. बरोबर दुर्वास मुनींना घेतले. दोघेही अयोध्येत आले. काळ राजवाड्यात आला व त्याने रामरायांना भेटण्याची इच्छा प्रगट केली. रामरायांनी त्याला ओळखले. काळाने प्रभूंना एकांतात बोलण्याची विनंती केली. प्रभूंनी लक्ष्मणाला दारात पहारा देण्यासाठी उभे केले व कोणालाही आत न सोडण्याची आज्ञा केली. आज्ञा मोडली तर मृत्यूदंड दिला जाईल असे बजावले. लक्ष्मण पहारा देत उभे राहिले. एकांतात काळाने भगवंताना आपले अवतार कार्य संपवण्याची विनंती केली.

प्रभूंनी आपली विवशता बोलून दाखवली, की लक्ष्मण व हनुमंत यांच्या भक्तीने मी बांधला गेलो आहे, ते मला अवतार संपवू देणार नाहीत; परंतु लक्ष्मणांना बाजूला करण्याची योजना तर झालेली आहे. तुम्ही हनुमंतांना बाजूला करा अशी विनंती केली. प्रभूंनी त्यास होकार दिला.

योजनेप्रमाणे प्रभूंचे एकांतात बोलणे चालू असताना दुर्वास मुनी तेथे आले. त्यांनी रामास भेटायचे आहे असे सांगितले. लक्ष्मणाने नकार दिला. कोणालाही आत सोडायचे नाही अशी प्रभूंची आज्ञा असल्याचे सांगितले पण दुर्वास मुनी ऐकेनात. ते अत्यंत क्रोधित होत म्हणाले, आपली भेट नाकारणाऱ्या श्रीरामास आता मी भयंकर शापच देतो. लक्ष्मणापुढे आता धर्मसंकट उभे राहिले.

मुनींना आत जाऊ द्यावे तर प्रभूआज्ञेचं उल्लंघन होईल व मृत्यूदंडाला सामोरे जावे लागेल, नाही जाऊ द्यावे तर पितृतुल्य बंधूंना मुनी भयंकर शाप देतील. शेवटी लक्ष्मणाने मृत्यूला सामोरे जाण्याचे ठरवले. रामरायांना विचारुन येतो असे म्हणून लक्ष्मणाने कक्षात प्रवेश केला. लक्ष्मणाला पाहताच प्रभू रामचंद्रांनी त्यांना आपल्या आज्ञेची आठवण करुन दिली; परंतु दुर्वास ऋषी आल्यामुळे आज्ञा मोडावी लागली असे लक्ष्मणाने सांगितले. तेव्हा प्रभूंनी त्याला मृत्यूदंडाऐवजी तू अयोध्येच्या बाहेर निघून जा, हाच तुझ्यासाठी मृत्यूदंड आहे, असे सांगितले.

प्रभू रामचंद्राशिवाय एक क्षणही आपण जगू शकत नाही तेव्हा हा देह काळाच्या अधीन केलेला बरा, असा विचार करत लक्ष्मण शरयू तीरावर गेले, शरयू नदीत आपला देह त्यागून आपल्या मूळ स्वरुपात म्हणजे पुन्हा शेषनाग होऊन प्रभूंच्या येण्याची वाट पाहत बसले. इकडे प्रभू रामचंद्रांचा काळाने निरोप घेतला. प्रभू खोलीच्या बाहेर आले. त्यांनी आपल्या हातातली अंगठी काढली. महालाच्या दोन दगडांमध्ये एक छोटीशी फट होती, त्या फटीत ती अंगठी टाकली. हनुमंतांना बोलावून प्रभूंनी त्यांना फटीत अडकलेली अंगठी काढण्यास सांगितले; पण फट लहान असल्याने हनुमंताने सूक्ष्मरुप घेतले व त्या फटीत गेले. पण ती फट म्हणजे एक मोठं विवर होतं. त्यातून हनुमंत थेट पाताळात गेले.

इकडे लक्ष्मणाचा वियोग आपणास सहन होत नाही म्हणून आपणही शरयूमध्ये समर्पित होतो असे प्रभूंनी सांगितलं. प्रजाजन रडू लागले. शोक करु लागले. रस्ता अडवू लागले.

प्रभूंनी मात्र कोणाचं न ऐकत शरयू नदीच्या तीरी आले. सर्व प्रजाही बरोबर आली. ज्या मार्गाने लक्ष्मणजी गेले त्याच मार्गाने प्रभूंनीही प्रवेश केला. त्यांच्यासोबत अमात्य, सुग्रीव, अंगद, नील इ. अनेकांनी शरयूत देह विसर्जित केला व आपल्या मूळ रुपात आले.

इकडे हनुमंत पाताळात पोचले. वासुकीने त्यांचे स्वागत केले व येण्याचे कारण विचारले. प्रभूंची अंगठी शोधण्यासाठी येथे आलो असे हनुमंतांनी सांगितले. वासुकीने त्यांना अंगठ्यांचा ढीग दाखवला व यातून प्रभूंची अंगठी शोधून घेऊन जा असे सांगितले; परंतु त्या सगळ्या अंगठ्या सारख्याच होत्या. सर्व रामरायांच्याच होत्या. त्यामुळे हनुमंतांपुढे संभ्रम निर्माण झाला. तेव्हा खरी हकीकत वासुकींनी त्यांना सांगितली. प्रभू आपल्याला सोडून जात आहेत, हे ऐकून हनुमंत मनोवेगाने शरयूतीरी आले. सर्व प्रजाजन शोक करीत होते. हनुमंतांनाही शोक अनावर झाला. त्यांनी प्रभूंना दर्शन देण्याची विनंती केली. तेव्हा शरयूतून शेषावर पहुडलेले भगवान महाविष्णू प्रगट झाले. सर्वांना आनंद झाला. सर्वांनी भगवंताचे दर्शन घेतले.

आपले अवतार कार्य संपल्यामुळे आपण वैकुंठी जात आहोत, कोणीही शोक करु नका असे त्यांनी सांगितले. आपले दोन्हीही पुत्र व बंधूंचे पुत्र यांच्याकडे राज्यव्यवस्था सोपवली आहे. त्यांच्या आज्ञेत सुखाने राहा असा आशीर्वाद दिला. हनुमंत प्रभूंसोबत येण्याचा हट्ट करु लागले. प्रभूंनी त्यांना चिरंजीव असल्याची आठवण करुन दिली व पुढील कृष्णअवतारात तुला पुन्हा दर्शन देईन असे वचनही दिले. त्यांना अयोध्येच्या रक्षणाची जबाबदारी दिली आणि सर्वांचा निरोप घेत प्रभूंनी वैकुंठाला गमन केले.

जेव्हा जेव्हा धरतीवर अधर्म वाढतो तेव्हा तेव्हा ईश्वर असे अवतार धारण करत असतो.

❐❐❐

# सतीशचंद्र दासगुप्ता

## (भारतीय बनावटीच्या अग्निरोधकाचा निर्माता)



भारतीय राष्ट्रवादी संशोधक सतीशचंद्र दासगुप्ता यांचा जन्म १४ जून, १८८० रोजी बंगालमधील रंगपूर जिल्ह्यात कुटीग्राम गावात (आता बांग्लादेश) एका गरीब कुटुंबात झाला. त्यांनी रसायनशास्त्राची पदवी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजातून प्राप्त केली. पदवीनंतर ते बेंगॉल केमिकल्सच्या प्रयोगशाळेत प्रयोग करीत असताना प्रसिध्द शास्त्रज्ञ आचार्य पी.सी. रॉय यांनी या तरुण संशोधकातील गुण आणि कष्टाळूपणा हेरला आणि त्यांची फॅक्टरी सुपरवाईजर म्हणून नेमणूक केली.

भारतात आढळणाऱ्या काजरा वनस्पतीपासून त्यांनी स्ट्रेचनाईन तसेच खराब झालेल्या चहाच्या पानांपासून कॅफ्फीन तयार करण्यात यश मिळवले. त्याकाळी फायर एक्सटिंग्विशर (आग प्रतिबंधक यंत्र) भारतात खूप महागडे होते. सतीशचंद्र दासगुप्तांनी ब्रिटीश फायर एक्सटिंग्विशरचा अत्यंत बारकाईने अभ्यास करुन पावपट कमी किंमतीत सुधारित फायर एक्सटिंग्विशर बनविले. यास **फायर किंग** हे नाव देण्यात आले. प्रयोगशाळेत संशोधन करण्याबरोबरच त्यांना सुतारकाम व लोहारकामाची आवड होती. त्यांनी कृषी उत्पादनाकरीता बरीच नवीन उपकरणे तयार केली.

सतीशचंद्र यांच्यावर गांधीजींच्या विचारांचा खूप प्रभाव होता. सतीशचंद्र गांधीजींच्याबरोबर राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाले. त्यांनी आपली सर्व संपत्ती स्वातंत्र्य चळवळीसाठी दान केली. वर्धा येथील ग्रामीण उद्योग संशोधन केंद्राचे प्रमुख म्हणून काम करण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यांनी चरख्याचे अधिक कार्यक्षम डिझाईन तयार केले. त्यांनी तेलघाणी, बांबूच्या लगद्यापासून स्वस्त कागद तयार करण्याची प्रक्रियाही शोधून काढली.

भारत स्वतंत्र झाल्यावर त्यांची उच्च पदावर नेमणूक करण्यात आली. ती नाकारुन त्यांनी कोलकात्याजवळील सोदेपूर येथील खादी प्रतिष्ठानात काम करणे पसंत केले. तेथे त्यांनी मोहरीचे तेल काढण्याचे यंत्र व तागाचा धागा तयार करण्याचे यंत्र तयार केले.

वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी कृषी रिसर्च फॉर्मची स्थापना करुन कृषी क्षेत्रात संशोधन सुरु केले. कमीत कमी पाणी पुरवठ्याच्या साहाय्याने जास्तीत जास्त पीक कसे घेता येईल हे या संशोधनाचे ध्येय होते. त्यांनी हाताने कागद बनविण्याचे तंत्रही चांगलेच विकसित केले. बांबूच्या काड्यांपासून आगपेटी तयार करण्यातही त्यांनी यश मिळविले. Cow In India, Home and Village Doctor आणि Fountain Pen Ink ही त्यांनी लिहिलेली प्रसिध्द पुस्तके होत.

२४ डिसेंबर, १९७९ रोजी या अवलिया संशोधकाचे कोलकाता येथे निधन झाले.

❐❐❐







# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त

लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी योग हे उपयुक्त ठरते. नियमित योगसाधना करणाऱ्या प्रत्येकाला त्याचे फायदे मिळतात. शारीरिक आरोग्यासोबत मानसिक आरोग्य राखण्याचे कामही योग अत्यंत उत्तम करतं. त्यामुळे लहानपणापासून योगसाधनेची सवय लावली तर मुलांना व्यायामाची गोडी लागेल. तसंच शरीराची लवचिकता वाढेल. उंची वाढण्यास मदत होईल. एकाग्रता, स्मरणशक्ती वाढेल. २१ जून रोजी 'जागतिक योग दिन' जगभरात साजरा केला जाईल. यंदाच्या योगदिनानिमित्त बालमित्रांसाठी योगसाधनेचे महत्त्व काय? योगसाधनेला सुरुवात करण्यासाठी कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी. जाणून घेऊ या...

**बालमित्रांना मिळणारे योगसाधनेचे फायदे :**

- नियमित योगसाधना केल्यामुळे उभे राहण्याची, बसण्याची स्थिती योग्य राहते.
- अभ्यासात एकाग्रता नसणे ही मुलांमध्ये आढळणारी सामान्य समस्या. योगसाधनेमुळे एकाग्रता वाढण्यास नक्कीच मदत होते.
- नियमित योगसाधना, ध्यान यामुळे स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते.
- रोगप्रतिकारकशक्ती वाढण्यासाठी योगा करणे फायदेशीर ठरते.
- योगसाधनेमुळे अंगात धैर्य, तसंच सकारात्मक विचार करण्याची प्रवृत्ती वाढते.

बालमित्रांनो योगसाधनेला सुरुवात करण्यापूर्वी कोणती काळजी घ्याल ?

- हळूहळू सुरुवात करा.
- सुरुवातीला सोप्या आसनांपासून सुरुवात करा.

योग्य तंत्रासह आसने करा. त्यामुळे कोणताही त्रास होणार नाही. आसनाच्या अंतिम स्थितीत जितका वेळ राहणे शक्य आहे, तितकाच वेळ राहा. कोणताही अट्टाहास करु नका.

**अंतिम स्थिती योग्य आहे की नाही ते तपासा :**

सुरुवातीपासूनच योग्य पध्दतीने आसने केल्याने शरीराला तसे वळणच लागते. त्यामुळे आसनाची अंतिम स्थिती चुकत नाही. त्यामुळे सुरुवातीला प्रशिक्षिकाच्या देखरेखीखालीच आसन करा.

**श्वासाकडे लक्ष ठेवा:**

- आसने करताना श्वासाकडे लक्ष ठेवा. श्वास कधी घ्यायचा, कधी सोडायचा हे नीट समजून घ्या.

उर्वरित पान क्र. ११ वर



कथा

# दक्षिणा

काशीक्षेत्री गंगाकिनारी अनेक धार्मिक विधी केले जातात. त्यावेळी आजच्यासारखे घाट बांधलेले नव्हते. त्यामुळे काशीच्या राजाकडे काही पुरोहित गेले. त्यांनी धार्मिक विधीसाठी गंगाकिनारी घाट बांधून द्यावा असा आग्रह धरला. राजा म्हणाला, ठीक आहे; परंतु तुम्ही गोरगरिबांना देखील मदत केली पाहिजे. सर्वांनी राजाला तसे वचन दिले. राजाने गंगाकिनारी घाट बांधून दिला.

एके दिवशी राजा वेश पालटून गरीब व्यक्ती बनून घाटावर आला. तिथे पुरोहित धार्मिक विधी करत होते. त्यांच्याजवळ जात राजा म्हणाला, "विप्रवर! मी अतिशय गरीब अहे. माझ्याजवळ दक्षिणा म्हणून द्यायला काहीही नाही. माझ्या वडिलांची शेवटची इच्छा होती, की गंगाकिनारी छोटीशी पूजा घालावी. माझ्याकडे धन नसलं तरी हे चार लाडू आहेत. त्यांचा आपण स्वीकार करावा." पंडित लोभी होते. त्यांनी स्पष्ट नकार देत गरीबाच्या वेशातील राजाला हाकलून लावले. बराच वेळ थांबूनही त्याची दखल कोणी घेतली नाही. शेवटी एक दयाळू पुरोहित तयार झाला. तो राजाला म्हणाला, " भाऊ! पैशाचं काही नाही. तुमच्या वडिलांची शेवटची इच्छा महत्त्वाची आहे. मी पूजा घालून देतो."

पूजा संपन्न झाल्यानंतर राजाने दक्षिणा म्हणून पुरोहिताला चार लाडू असलेले गाठोडे दिले आणि सांगितले, "घरी गेल्याशिवाय हे गाठोडे उघडू नका." पुरोहित म्हणाला, "ठीक आहे."

घरी गेल्यानंतर तो जेवायला बसला असताना त्याला त्या गरीब व्यक्तीने दिलेल्या लाडूच्या गाठोड्याची आठवण झाली. पत्नीला त्याने ते उघडून पाहायला सांगितले. पाहतो तर काय! त्याच्यामध्ये चक्क चार मौल्यवान माणिके होती.

राजाने दुसऱ्या दिवशी सर्व पुरोहितांना दरबारात बोलावून घेतले. दयाळू पुरोहिताचा सत्कार केला आणि लोभी पुरोहितांना चांगलेच खडसावले.



## विचारपुष्प

# विनम्रता धारण करावी

एक राजा होता. तो एका महत्त्वाच्या कामासाठी निघाला होता. वाटेत जाता जाता त्याला लक्षात आलं, की या ठिकाणी आपल्या गुरुदेवांची पर्णकुटी आहे. त्याने विचार केला, की महत्त्वाच्या कार्याला जाण्याआधी आपण आपल्या गुरुदेवांचं दर्शन घेऊ या. नंतर पुढे जाऊ. तो गुरुदेवांकडे गेला आणि म्हणाला, “ गुरुदेव आपण माझ्यामध्ये आध्यात्मिक विकास घडवून आणला. मी आपली काय सेवा करु शकतो ?” क्षणभर गुरुदेव शांतच होते. राजा मनोमन विचार करु लागला, की गुरुदेव म्हणतील, की तू तर राजा आहेस. तू मला धनदौलत किंवा सोनंनाणं दे; परंतु गुरुदेवांनी तसं काही मागितलं नाही. गुरुदेव त्याला शांतपणे म्हणाले, “माझ्या अंगावर माशा बसत आहेत. त्या

उडव." राजा मनात म्हणाला, 'आपल्या गुरुदेवांनी तर आपल्या योग्यतेच्या मानाने फारच क्षुल्लक गोष्ट मागितली. माशा तर काय कोणीही उडवू शकला असता. मी तर राजा आहे. माझ्याकडे अनेक अशा अनमोल वस्तू आहेत; ज्यामुळे माझा मान-सन्मान वाढलेला आहे. ठीक आहे, आता गुरुदेवांनी आदेश दिला आहे माशा उडवण्याचा तर ती सेवा करु या.' गुरुदेव त्याच्या मनातील सर्व भावभावना जाणत होते. ते राजाला प्रेमाने समजावत म्हणाले, "राजन! कोणतीही सेवा लहान किंवा मोठी नसते. आपली योग्यता किंवा दर्जा यात नसतो. माशा उडवण्याची जी सेवा तू केलीस ती देखील श्रेष्ठ आहे. धनाच्या अभिमानात येऊन जर तू धनाची सेवा केली असती तर त्यात तो आनंद नसता, जो नम्रतेने केलेल्या सेवेत आहे."

या गोष्टीतून एकच भाव समोर येतो, की आपण मनामध्ये कुठलाही अभिमान बाळगू नये. आपणच श्रेष्ठ आहोत, आपला दर्जा उच्च आहे अशा भावना नसाव्यात, तर विनम्रता आणि सहनशीलता या गुणांनी आपण मोठं व्हायचं आहे.

एखादं झाड उंच आणि विशाल तेव्हाच होतं, जेव्हा जमिनीत बी रुजून त्याची मुळं खोलवर जातात. मुळं जेवढी अधिक खोलवर जातील तेवढं ते झाड मजबूत आणि उंच वाढत जातं; परंतु तरीही फळं लागल्यावर ते आपोआप झुकत जातं. अशाप्रकारे आपल्याला जीवनामध्ये जरी खूप काही गोष्टी प्राप्त झाल्या, तरी आपण हेच समजायला हवं, की ही तर प्रभू-परमात्म्याची देण आहे. आपली स्वत:ची तर कुठलीही योग्यता नाही. यासाठी अहंकार न करता नम्रता धारण करावी.

❑❑❑

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त (पान ०८ वरुन)

**आसने पूर्ण करा :**

काही आसने दोन्ही बाजूने करायची असल्याने केवळ एका बाजूने केल्यानंतर सोडून देऊ नका. दुसऱ्या बाजूने देखील करुन आसनाचा परिघ पूर्ण करा.

**नवी आसने शिका :**

साधी सोपी आसने नीट जमू लागली की नवी आसने शिका. त्यातून नक्कीच आनंद मिळेल.

**या चूक टाळा :**

आसनाची अंतिम स्थिती अचूक येण्यासाठी कोणताही अट्टाहास करु नका. त्यासाठी कोणत्याही अवयवावर अधिक ताण देऊ नका. नियमित सरावाने योग्य अंतिम स्थिती धारण करणे सहज शक्य होईल.

तसंच योगसाधना करताना शरीराला कोठेही धक्का बसणार नाही याची योग्य काळजी घ्या. घाईघाईने कोणतेही आसन करु नका.

**बालमित्रांना लाभदायक असे काही योगासने :-**

प्रणाम आसन, हस्तोतानासन, हस्त पादासन, अश्व संचालनासन, दंडासन, अष्टांग नमस्कार, भुजंगासन, पर्वतासन, ताडासन, धनुरासन, वृक्षासन, मर्जरी आसन, वज्रासन, वीरभद्रासन, शिशुआसन.

मित्रांनो बालपणापासूनच आपण योगसाधनेची सवय लावली तर आपले शारीरिक आरोग्य राखले जाईलच; पण त्याचबरोबर सकारात्मक विचार करण्याकडे तुमचा कल असेल. आत्मविश्वास वाढेल. योगा केवळ व्यायाम प्रकार नाही तर ती आपली प्रकृती आहे. आणि जी आपली प्रकृती असते ती नेहमी आपल्या प्रकृतीसाठी सहाय्यक असते. त्यामुळे या योगदिनी आपण योगसाधनेचे महत्त्व समजून घेऊ आणि योग्य प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाने योगसाधनेचा प्रारंभ करु या.

❑❑❑

# जेष्ठाची चाहूल

जेष्ठाची चाहूल लागली
वणवा संपला वैशाखाचा
संपूनी गेले साम्राज्य उन्हाचे
अनुभव आला ऋतू बदलाचा

विद्युल्लता ही नभी चमकता
ढोल ढगांचा वाजू लागला
तड तड वाजे थेंबाचा ताशा
सुरात वारा गाऊ लागला

धरतीचा किती थाट साजिरा
श्रृंगार हिरवा शोभे तिजला
पाना-फुलांतून चैतन्य बहरले
सुटला सुगंध ओल्या मातीला

पक्षी किलबिल करु लागले
थव्या-थव्यांनी उडू लागले
फुलाफुलातील मध चाखण्या
भुंगे रुंजी घालू लागले

बाळगोपाळही हर्षित झाले
नाचू बागडू गाऊ लागले
जलधारा बरसता अंगावरती
धुंद होऊनी खेळू लागले

कवी - कैलास कुटे (बदलापूर)



# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्‌गुरु बाबाजींचे

**प्रश्न : दादा, दु:खाचं मूळ कारण काय ?**

उत्तर : दु:खाचं मूळ कारण स्वत:च्या अस्तित्वाबद्दलचं अज्ञान. मी कोण आहे ? माझं मूळ स्वरुप काय आहे याबाबतचं अज्ञान हेच दु:खाचं मूळ कारण आहे.

❒ ❒ ❒

**प्रश्न : मनुष्याला भय केव्हा वाटू लागतं ?**

उत्तर : 'मी कोण आहे ?' हे न समजल्यामुळे मनुष्य स्वत:ला कर्ता समजू लागतो. त्यातूनच यश-अपयश, लाभ-हानी, किर्ती-अपकिर्ती यासारखे भेद उत्पन्न होतात. आत्मज्ञान नसल्यामुळे माझं-तुझं, आपला-परका असे भेद निर्माण होतात. मनुष्य निरनिराळ्या उपाधी स्वत:ला लावून घेतो. सत्ता, संपत्ती, यश, किर्ती या गोष्टी कोणी हिरावून घेऊ नये म्हणून चिंतीत होतो. त्यातूनच त्याच्या मनात भय निर्माण होतं. सर्वात मोठं भय आहे मृत्यूचं. मी देह आहे. या गैरसमजामुळे देहाविषयी आसक्ती व ममत्व वाढलेले असतं. त्यामुळे त्याला मृत्यूची भीती वाटू लागते.

❒ ❒ ❒

**प्रश्न : निर्भयता कशी आणता येईल ?**

उत्तर : आत्मज्ञानी व्यक्ती निर्भय असते. किंबहुना निर्भयता हेच ज्ञानी व्यक्तीचं लक्षण म्हणता येईल. आत्मज्ञानाने प्रथम या नश्वर प्रपंचाची आसक्ती कमी होते. आत्मस्वरुपाला जन्म-मरण, जरा-व्याधी नाहीत हे जाणल्याने देहाची आसक्ती कमी होते. सत्ता, यश, कीर्ती या नश्वर गोष्टी असून ईश्वरी सत्तेने या सृष्टीचे नियमन होते, हे जाणल्याने कर्ताभाव नष्ट होतो. शाश्वत व अशाश्वत गोष्टींचा बोध झाल्याने खरे सुख व आनंद हा ईश्वरी चिंतनात आहे. आणि वस्तू सुख-समाधान प्रदान करु शकत नाहीत हे जाणून ज्ञानी जण लाभ-हानीविषयी निश्चिंत असतात. थोडक्यात, हे सारे विश्व ईश्वरमय असल्याने येथे भेदभावाला वाव नाही. ब्रह्मज्ञानामुळे सर्वांभूती भगवद्‌भाव प्रगट झाला, की आपोआपच निर्भयता येते. तिथे वैर, द्वेष, ईर्ष्या या गोष्टींना स्थान उरत नाही. सर्वांमध्ये प्रेमभाव निर्माण होतो. प्रेम ही एक सकारात्मक भावना आहे. प्रेम असेल तर वैर-विरोध नियंत्रणात राहतात. आपसातील भेदभावाच्या भिंती नष्ट होतात. दुरावे मिटतात. वातावरण निर्भय आणि निर्वैर होते.


❒ ❒ ❒



# शब्दकोडे

## २१९

❍ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)




### आडवे शब्द

१. रामायणातील भरत हा सीतामातेचा नात्याने ......होता.

३. सावंतवाडी, देवगड, वैभववाडी, कणकवली हे तालुके ह्या जिल्ह्यात आहेत.

५. हळदीनंतरचा कार्यक्रम

६. रामकृष्ण परमहंस यांचे मूळ नाव : ....... चटोपाध्याय (विद्याधर / गदाधर)

७. या भारतीय राज्याची राजधानी रांची आहे.

८. लिंबूमधून मिळणारे जीवनसत्त्व

१०. एक मिष्ठान्न (गोड पदार्थ)

१२. मुसलमान बांधवांचा उपवास

१४. भारताचे माजी पंतप्रधान ....... हे १९५२ ते १९५६ पर्यंत मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते.

### उभे शब्द

२. आठवड्यातील सुट्टीचा दिवस

३. हा किल्ला पुणे जिल्ह्यात आहे

४. धृतराष्ट्राचा ज्येष्ठ पुत्र

७. भारताचे पहिले मुस्लिम राष्ट्रपती डॉ. ...... हुसेन

९. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आईचे नाव

११. ..... जून, १६७४ रोजी जिजामातेने देह ठेवला

१३. 'कांदा' चे अनेकवचन

उत्तरे इतरत्र

# आला पाऊस, सावध राहा!

मित्रांनो! आता पावसाळा सुरु झाला आहे. पाऊस पडायला लागला, की पावसात भिजायला खूप मजा वाटते, नाही का! पावसात भिजण्याचा आनंद लुटत असताना आपण सावधगिरी बाळगली पाहिजे. कारण पावसाळा म्हटला, की ढगांचा गडगडाट आणि विजांचा लखलखाट. आकाशातील वीज कधी, कशी, कुठे कोसळेल हे सांगता येत नाही. म्हणून थोडी सावधगिरी बाळगणे उत्तम. विजा चमकत असताना झाडाखाली उभे राहू नये. तसेच मोबाईलवर बोलू नये. मोबाईल बंद ठेवावा.

पाऊस पडत असताना पाण्यात किंवा पाण्याजवळ थांबू नका. पाणी विजेचा एक चांगला वाहक आहे. वीज पडण्याचा पाण्यावर सर्वात जास्त परिणाम होतो. म्हणून चमकणाऱ्या विजांसह पडणाऱ्या पावसात किंवा साठलेल्या पाण्याजवळ जाऊ नका. शॉक लागण्याचा संभव असतो. तसेच ओल्या अंगणातही अनवाणी फिरु नका.

पाऊस पडत असताना लोखंड अथवा धातूंच्या वस्तूंवरही विजेचा ताबडतोब परिणाम होतो. इलेक्ट्रिकचे खांब, झाडे यावरही वीज झटकन खेचली जाते म्हणून अशा वस्तूंपासून दूर राहिले पाहिजे.

पाऊस पडत असताना आपण आपल्या घरात असतो. अशावेळी विजेच्या बटनांशी खेळू नका आणि हातही लावू नका. कारण विजेचा प्रवाह ओल्या भिंतीतून वाहू शकतो. ओलाव्यामुळे विजेचा शॉक लागण्याची जास्त शक्यता असते.

पाऊस पडत असताना उघड्या खिडकीतून किंवा दारातून वादळी पाऊस पाहणे घातक असते. खिडकीला लोखंडी शिगा व दाराला लोखंडी कडी असते. खिडकीची चौकट आणि दरवाजा जरी लाकडाचा असला तरीही त्यावर असलेल्या लोखंडी वस्तू ओल्या झाल्याने झाडाप्रमाणे या वस्तू त्वरीत खेचून घेतात. म्हणून अशा वस्तूंना हात लागणार नाही अशी सावधगिरी बाळगायला हवी.

❑❑❑

# चित्रकथा

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







महेश, तुझी वही घेऊन ये पाहू!
महेश, तुझा गृहपाठ अपूर्ण का आहे ?
मी..मी ... ते मॅडम
बाळ महेश, तुझ्या परीक्षेला केवळ एकच आठवडा राहिला आहे. आता तू अभ्यासाकडे दुर्लक्ष करु नकोस.
हो महेश ! तुझे बाबा अगदी बरोबर सांगत आहेत.


दुसऱ्या दिवशी
महेश विडियो गेम बंद कर बघू! आणि अभ्यास कर. काल तुझ्या बाबांनी तुला समजवलं होतं ना!
आई फक्त पाचच मिनिटं खेळतो
अशाप्रकारे बरेच दिवस निघून गेले. महेश अभ्यास करणे टाळत गेला. तो दिवसभर खेळून रात्री थकून झोपी जायचा.
महेश, चल अभ्यास कर पाहू! उद्या तुझी परीक्षा आहे ना.
बाबा, मी रात्री अभ्यास करीन.


अरे लाईट तर गेली, आता मी अभ्यास कसा करु ? उद्या तर माझी परीक्षा आहे आणि मी काहीच अभ्यास केलेला नाही.
आम्ही समजावत होतो ना, अभ्यास कर-कर म्हणून; पण तू आमचं ऐकतच नव्हतास.
मला क्षमा करा बाबा! मी यापुढे अभ्यासाकडे दुर्लक्ष करणार नाही.
तुला तुझ्या चुकीची जाणीव झाली हीच फार मोठी गोष्ट आहे.
तात्पर्य : जो वेळेचा सदुपयोग करतो तोच यशस्वी होतो.




# प्रभूइच्छेने घडे सकळ

एकदा एका चोराने मोठी चोरी केली. पोलिसांनी त्याला शिताफीने पकडले आणि त्याच्यावर खटला भरुन कोर्टात उभे केले. त्या कोर्टात जे न्यायाधीश होते ते मोठे विठ्ठलभक्त होते. ठिकठिकाणी ते व्याख्यानं देत असत. चोराने त्यांच्या या स्व:भावाचा फायदा घेण्याचा विचार केला. त्याने न्यायाधीशांसमोर आपण गुन्हा केला असल्याचे कबूल केले. न्यायाधीश म्हणाले, "तू तुझा गुन्हा कबूल केला आहेस. तेव्हा तुला नियमाप्रमाणे शिक्षा केली जाईल; परंतु कोर्टाच्या नियमानुसार तुला जे काही म्हणायचे असेल ते तू मांडू शकतोस." चोर म्हणाला, "जजसाहेब! मी अनेकदा चोरीच्या गुन्ह्यात पकडलो गेलो आहे. मला शिक्षाही झाली आहे; परंतु आज तुमच्यासमोर मला माझ्या गुन्ह्याची कबुली देताना विशेष आनंद होत आहे कारण तुम्ही थोर विठ्ठलभक्त आहात. तुम्ही आपल्या व्याख्यानात नेहमी म्हणता, 'ईश्वरइच्छेने घडे सकळ' सर्व काही पांडुरंगाचया इच्छेनेच घडते. तेव्हा मला हेच सांगायचे आहे, की माझ्या हातून जी चोरी झाली ती पांडुरंगाच्या इच्छेनेच झाली. पांडुरंगाने जशी प्रेरणा दिली तसा मी वागलो. यात माझी काहीच चूक नाही." चोराचा युक्तिवाद ऐकून सारे लोक अवाक् झाले. आता न्यायाधीश काय निर्णय देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले.

न्यायाधीश मनात हसले. ते चोराला म्हणाले, "तू जे काही सांगितले ते कोर्टाला पूर्णपणे मान्य आहे. ज्या पांडुरंगाने तुला चोरी करण्याची प्रेरणा दिली, म्हणून तू चोरी केलीस. तशी मला देखील

उर्वरित पान क्र. २२ वर



# सर्वधर्मसमभावाची शिकवण

संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीत हिंदी भाषेत लिहिलेले काही अभंग वाचायला मिळतात. यापैकी एका अभंगातील या ओळी आहेत -

अल्ला देवे अल्ला दिलावे, अल्ला दवा अल्ला खिलावे।
अल्ला बगर नही कोये, अल्ला करे सो ही होये।
जिकिर करो अल्ला की, बाबा सबल्या अंदर भेस।
कहे तुका जो नर बुझे, सो ही भया दरवेस।

या अभंगाबाबत एक प्रसंग सांगितला जातो, की -

एके दिवशी संत तुकाराम महाराज पुण्याहून दिंडी घेऊन जात होते. दिंडीत सहभागी झालेले वारकरी हरिभजनात दंग होऊन चालले होते. दिंडी एका चौकात आली असताना जोराचा वारा वाहू लागला. थोड्या वेळातच मुसळधार पाऊस सुरु झाला. दिंडीतील वारकरी आडोसा शोधत इकडे तिकडे पळू लागले. मिळेल त्या ठिकाणी जाऊन आडोशाला उभे राहिले; परंतु तुकाराम महाराज मात्र पावसात तसेच भिजत उभे राहिले. त्या चौकात एका बाजूला एक मंदिर होतं तर दुसऱ्या बाजूला एक मशीद होती. तुकाराम महाराजांचा द्वेष करणाऱ्या ब्राह्मणांनी तुकारामजींना पाहिलं; परंतु ते मंदिरात आले तर विटाळ होईल असे म्हणून त्यांनी मंदिराचा दरवाजा बंद करुन घेतला. त्याचवेळी मशिदीत काही मुल्ला-मौलवी होते. तुकाराम महाराजांना भिजत असलेले पाहून ते म्हणू लागले,

'अरे ! वो तुकाराम भिग रहा है। बहुत अच्छा संत है। उसको अंदर लाना चाहिये।' मशिदीतील काही मुसलमान बांधवांनी तुकारामजींना आदरपूर्वक मशिदीत नेले. त्यांच्यामागून दिंडीतील वारकरीही गेले. सर्व वारकरी मशिदीमध्ये जमा झाले. रात्री कीर्तनाची वेळ झाली. आता मूर्तीपूजा मानत नसलेल्या मशिदीमध्ये तुकाराम महाराज कसे किर्तन करतील याची उत्कंठा सर्वांना लागून राहिली होती.

संत तुकाराम महाराज नेहमीप्रमाणे कीर्तनाला उभे राहिले आणि त्यांनी वरील अभंग गात त्याच्यावर विवेचन केले. हिंदू-मुस्लीम बांधव एकाग्रतेने कीर्तन ऐकत होते. संत तुकाराम महाराज एकाच ईश्वराचीच थोरवी गात होते. ते कधीही कुठल्या धर्माच्या विरोधात नव्हते. सर्वांना आपलेच बांधव मानत होते. सर्वधर्म समभावाचा हा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून समाजाला दाखवून दिला.

❐ नितीन घुरुप (माणगांव)

## प्रभूइच्छेने घडे सकळ (पान २० वरुन)

त्याच पांडुरंगाने प्रेरणा दिली, की तुला एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा द्यावी. तेव्हा पांडुरंगच्या इच्छेने तुला ही शिक्षा ठोठावत आहे." यावर तो चोर गप्पच बसला.

तात्पर्य : स्वार्थी लोक आपल्या स्वार्थासाठी संत महापुरुषांच्या वचनांचा सोयिस्कर अर्थ लावून आपल्या गुन्ह्यावर पांघरुण घालत असतात. वास्तविक जे काही घडते ते ईश्वरइच्छेनेच घडते असा ज्याचा दृढ विश्वास असतो त्याच्या हातून चुकीचं कर्म घडूच शकत नाही.

❐❐❐

विशेष - संगणकाविषयी

## तुम्हाला माहित आहे का?

- जगात सर्वात जास्त कॉम्प्युटर (३५ कोटी ७४ लाख) चीन मध्ये असून, अमेरिकेत (२६ कोटी ९३ लाख) आहेत. भारतात सध्या ४ कोटी १७ लाख कॉम्प्युटर वापरले जातात.
- विन्डोज ओ.एस. (Windows Operating System) मध्ये CON, AUX, NUL व PRN या नावाने फोल्डर बनवता येत नाही. कारण अशा प्रकारची शब्द DOS या ऑपरेटिंग सिस्टिमसाठी रक्षित करण्यात आली आहेत.
- जगप्रसिध्द व्हिडिओ चॅनल यु-ट्यूब ची निर्मिती १४ फेब्रुवारी २००५ मध्ये पेपल कंपनीच्या तीन कर्मचाऱ्यांनी केली होती. यात चाड हर्ले, स्टिव चेन आणि जावेद करीम अशी यांची नावे आहेत. नंतर गूगलने ही कंपनी खरेदी केली. यु-ट्यूब आज जगामधील दुसऱ्या क्रमाकांची सर्वात जास्त वापरली जाणारी वेबसाईड आहे.
- जगप्रसिध्द कंपनी इंटेल जे कॉम्प्युटर ब्रेन समजल्या जाणाऱ्या मायक्रोप्रोसेसरची निर्मिती करण्यात जगभर प्रसिध्द आहे. सन १९७१ मध्ये INTEL 4004 या पहिल्या मायक्रोप्रोसेसरची निर्मिती केली आणि याचा वापर कॅल्क्युलेटर मध्ये केलेला होता.
- आपणा सर्वांना मायक्रोसॉफ्ट विंडोज माहित आहे. नक्कीच याचा वापर आपण कधीतरी केला आहे. परंतु तुम्हाला माहित आहे का ? की मायक्रोसॉफ्ट विंडोजचे मूळ नाव इंटरफेस मॅनेजर होते.
- १९ सप्टेंबर १९८२ मध्ये स्कॉट फाइलमेन यांनी सर्वप्रथम इमोकॉन ची संकल्पना आणली. यात मनुष्याचे भाव-भावना एका विशिष्ट अक्षर आणि खास चिन्हे वर आधारित सांकेतिक स्वरुपामध्ये मांडण्यात आली. आज आपण यांना इमोजी नावाने देखील ओळखतो.
- सन १९५६ मध्ये पहिली संगणक हार्डडिस्क आय.बी.एम. या कंपनी मार्फत प्रस्तुत करण्यात आली. RAMAC 305 या सिस्टीम मध्ये याचा वापर केला गेला. या हार्ड डिस्कची संग्रहण क्षमता 5 MB होती.

❐❐❐

# मृत व्यक्तीचे वय कसे ओळखतात?

गुन्ह्याच्या तपासात पोलिसांना मदत करणारे वैज्ञानिक मृतदेहाच्या हाडांचे आणि दातांचे परीक्षण करुन त्यावरुन त्या मृत व्यक्तीचे वय ओळखतात. कारण आपल्या कवटीच्या मध्यभागी दोन बाजूंची सपाट हाडं शिवल्यासारखी साधली जातात. या शिवणीचे स्वरुप पाहून त्या व्यक्तीचं वय ओळखता येतं. तसेच बरगड्या जिथं मधल्या हाडाला जोडल्या जातात तिथल्या बरगड्यांच्या टोकाची तपासणी करुनही वयाचा अंदाज बांधता येतो. कारण सुरुवातीला ही टोकं पसरलेली आणि गोलसर असतात; पण जसजसं वय वाढत जातं तसतशी वापरामुळे ही टोकं खडबडीत होऊ लागतात.

जन्म होण्यापूर्वी म्हणजे आईच्या पोटात असल्यापासूनच व्यक्तीच्या हाडांची तपासणी करुन वय ओळखण्याची पध्दत वैज्ञानिकांनी विकसित केली आहे. त्यानुसार निरनिराळ्या वयात निरनिराळ्या हाडांच्या वैशिष्ट्यांचा उपयोग होतो. तसंच वेगवेगळ्या प्रकारचे दात येण्याचं वयही वेगळं असतं. दुधाचे दात साधारणतः सहाव्या महिन्यापासून यायला सुरुवात होतात. ते पडून जेव्हा पक्के दात येतात तेव्हा त्यांचा कालखंडही वेगवेगळा असतो. अक्कलदाढ तर विसाव्या वर्षानंतर येते. तरीही या सर्व दातांच्या जडणघडणीची तयारी जन्मल्यापासूनच होत असते. त्यामुळे दातांच्या स्थितीवरुन व्यक्तीचं वय ओळखणं शक्य होतं.

पण या सर्व चाचण्या अचूक वयनिदान करु शकत नाहीत. त्या चाचण्यांवरुन केलेलं निदान दोन वर्षांनी कमी-जास्त असू शकतं. म्हणजेच या चाचण्यांमधून एखाद्या मुलीचं वय सोळा आहे असा निष्कर्ष काढला गेला असेल तर तिचं वय १४ ते १८ या दरम्यान असू शकतं.

❒ संग्राहक - रुपाली शिंदे (अंबरनाथ)

## अंकाची गंमत

1 x 8 + 1 = 9
12 x 8 + 2 = 98
123 x 8 + 3 = 987
1234 x 8 + 4 = 9876
12345 x 8 + 5 = 98765
123456 x 8 + 6 = 987654
1234567 x 8 + 7 = 9876543
12345678 x 8 + 8 = 98765432
123456789 x 8 + 9 = 987654321

गंमत पहा! घड्याळातील समोरासमोरील अंकांची बेरीज १२ येते.

उदा.




11 + 1 = 12
10 + 2 = 12
9 + 3 = 12
8 + 4 = 12
7 + 5 = 12



# झाकली मूठ सव्वा लाखाची !

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. सुमेर नगरीचा राजा रोज नगरामध्ये फेरफटका मारत असे. दर दिवशी एकेका ठिकाणाला भेट देऊन पाहणी करत असे. त्या नगरीत एक पुरातन शिवमंदिर होते. त्या मंदिराला राजा भेट देऊन पूजा करणार असे शिपायाने सांगितले.

मंदिराचा पुजारी खूप खूश झाला. आता प्रत्यक्ष राजाच येणार म्हणजे भली मोठी दक्षिणा देणारच, असा विचार करत त्याने सावकाराकडून एक हजार सुवर्णमुद्रा कर्ज म्हणून घेतल्या आणि दोन दिवसात मंदिराचा कायापालट केला; जेणेकरुन राजा खूश व्हावा. ठरल्याप्रमाणे राजा मंदिरात आला. त्याने पूजा केली. नंतर मंदिराची पाहणी केली आणि जाता जाता फक्त दोन नाणी दक्षिणा म्हणून देवापुढे ठेवली.

राजाने देवापुढे ठेवलेली दोन नाणी पाहून पुजाऱ्याचं डोकं गरगरु लागलं. सावकाराचं एक हजार मोहरांचं कर्ज कसं फेडणार ? आता आपल्याला या संकटातून कोण बाहेर काढणार ?

राजाचा प्रधान खूप हुशार आणि दयाळू होता. पुजारी प्रधानाकडे गेला. त्याला सारी हकीकत सांगितली. प्रधानाने पुजाऱ्याला धीर देत सांगितले,

उर्वरित पान क्र. ४४ वर



# भक्ताची खरी ओळख

एका राजाने एका विद्वानाला विचारले, "आपल्या नगरीत भक्त कोण आहेत, हे ओळखण्यासाठी काय केलं पाहिजे? भक्तजन आमच्या समोर आले तर आम्हाला त्यांचं दर्शन घेता येईल." त्यावर विद्वान म्हणाला, "मला एक युक्ती सुचली. आपण नगरीत दवंडी देऊ या, की जे प्रभू परमात्म्याची भक्ती करणारे आहेत, उपासना करणारे आहेत त्यांना कर द्यावा लागणार नाही."

दुसऱ्या दिवशी सकाळी जिकडे तिकडे कपाळावर गंध-टिळे लावलेले लोक दिसू लागले. सगळेच भक्त दिसू लागले. ते पाहून राजा म्हणाला, "ही तर फारच चांगली युक्ती आपण सांगितली. सगळे भक्तिमार्गाला लागलेले दिसत आहेत. खूप दिवस मी उदास होतो; पण आता माझं उदासवाणेपण दूर झालं." त्यावर विद्वान म्हणाला, "नाही महाराज! मी तर तुम्हाला केवळ एकच बाजू सांगितली होती. आता अशी दवंडी द्या, की जे जे भक्त आहेत त्यांना घाण्यामधून पिळून त्यांचे तेल काढायचे आहे. जनकल्याणासाठी केल्या जाणाऱ्या मोठ्या यज्ञात आहुती देण्यासाठी ते तेल वापरले जाईल. त्यासाठी सगळ्या भक्तांनी उद्या सकाळी राजवाड्यात यावे."

ही दवंडी ऐकून फक्त एकच भक्त राजाच्या राजवाड्यात दाखल झाला. जेव्हा कर माफ करण्याची घोषणा केली तेव्हा सगळीकडे भक्तच भक्त दिसू लागले होते; पण आता तेल काढायची घोषणा केली तर सगळ्यांनी कपाळावर लावलेले चंदनाचे टिळे-गंध पुसून टाकले. जेव्हा विचारणा करण्यात आली, की तुम्ही भक्त आहात ना? त्यावर उत्तर आलं, नाही हो! आम्ही कसले भक्त? राजाला आता खरी हकीकत कळली, की कोण खरा भक्त आहे!

जो ईश्वरावर प्रेम करतो तो कोणत्याही स्थितीत मागे हटत नाही. सुख-दु:खात दृढ राहतो. कशानेही डगमगत नाही, भरकटत नाही. भगवंतावरील प्रेम हीच भक्ताची खरी ओळख आहे.

❑❑❑


# वाढदिवसाच्या


अशिता बन


प्रणित पाटील


श्रिशा सूर्यवंशी


सर्वेश लिंगे


सार्थिक लवंदे


निहारिका म्हात्रे


शर्वी भगत


अथर्व


अर्श कुऱ्हाडे


साई भोईर


सक्षम शिंदे


स्वस्ती पवार

# हार्दिक शुभेच्छा



ओमकार पांचाळ



जीवेश रसाळ




प्रांजल



अर्णव



आशिष पाटील




रिदान पवार



नीलम जाधव




श्रीजा भदरगे



सर्वज्ञ निकम



छायांक पाटील



आनंदिता उकर्डे



शार्वी पंगेरकर





# मिनी वृंदावन - गोवर्धन इको व्हिलेज

उत्तर प्रदेशातील वृंदावन हे ठिकाण पाहणं जर आपल्याला शक्य नसेल तर चला जाऊ या आपल्या जवळच असलेल्या मिनी वृंदावनात. मुंबईपासून अवघ्या ९५ किलोमीटर अंतरावर असलेले हे ठिकाण मुंबई-अहमदाबाद हायवेने दोन तासात गाठता येते. किंवा रेल्वेने पालघर स्टेशनवर उतरल्यावर अवघ्या ३२ किलोमीटर अंतरावर हे गाव वसलेले आहे. वृंदावनातील श्रीकृष्णाच्या विविध लीला, त्याचप्रमाणे उत्तमप्रकारे केलेल्या कोरीव कामामध्ये श्रीकृष्णाच्या जीवनातील चितारलेले विविध प्रसंग पाहायला मिळतात. तसेच निसर्गरम्य वातावरणाचाही मनमुराद आनंद घेता येतो.

गोवर्धन इको व्हिलेज या ठिकाणी खूपशी कृत्रिम कुंडं तयार केलेली आहेत. त्यात रंगीबेरंगी मासे पोहताना दिसतात. इथे प्रवेश केल्यावर





सर्वप्रथम राधा मदन मोहन मंदिर लागते. राधा-कृष्ण, बलरामाच्या या मंदिरामध्ये सुंदर कोरीव काम पाहायला मिळते. तिथून जवळच गोवर्धन पर्वत आहे. गोवर्धन पर्वताला प्रदक्षिणा घालताना आजूबाजूला मथुरा, बरसाना, नंदगाव ही ठिकाणं तसेच अनेक लहान लहान कुंड दिसतील. नंदगाव मध्ये एक छोटसं कुंड आणि नंदभवन आहे. पुढे गेल्यावर मानमंदिर बरसाना आहे. त्यापुढे राधा दामोदर मंदिर तसेच घाट आहे. जवळच मथुरा वसवलेलं आहे. तिथे श्रीकृष्णाच्या जन्मकथेची विविध दृश्ये पाहायला मिळतात. पुढे यमुना घाट बनवलेला आहे. त्याठिकाणी रोज सायंकाळी यमुनेची आरती होते.

एकंदरीत संपूर्ण परिसर हा कृष्णमय झालेला आढळतो. त्यामुळे भक्त भाविकांना तसेच कलाकुसरीचा आनंद घेणाऱ्यांना आणि निसर्गाचा मनमुराद आनंद लुटणाऱ्यांना कुटुंबासह या ठिकाणी भेट देऊन एक दिवसीय सहलीचा लाभ घेता येतो.

या ठिकाणी भोजन व नाष्ट्याची उत्तम व्यवस्था तसेच राहण्याची देखील सोय आहे.

❐❐❐



♦ परमात्मा कणाकणात असून अंगसंग आहे. परमात्म्याची ओळख झाल्याने द्वैत भाव संपून जातो आणि सकलांच्या प्रति आपुलकीचा भाव साकारतो.

♦ मनाचे नाते ईश्वराशी जोडलेले असेल तर प्रत्येक कार्य सहजपणे पार पडते आणि मनामध्ये सहनशीलता व समर्पणाची भावना येते.

–सद्‌गुरु माता सुदीक्षाजी महाराज

# हसा मुलांनो हसा



वडील : सोन्या, गणितात तुला किती गुण मिळाले ?

सोन्या : बाबा, १०० मधला एक कमी करा.... तेवढे !

वडील : अरे व्वा ! म्हणजे ९९ गुण मिळाले की काय ?

सोन्या : तसं नाही हो, १०० मधला एक पुसून टाका, तेवढे !

गण्या : हे बघ, बन्या जर रस्त्यावर एक पाचशेची आणि एक दोनशेची नोट पडलेली असेल तर तू त्यातील कोणती नोट उचलशील ?

बन्या : पाचशेची !

गण्या : तू किती मूर्ख आहेस !

बन्या : ते कसं काय ?

गण्या : अरे तू दोन्ही नोटा उचलू शकतोस ! तुला कोणी अडवलंय ?

पेंटरची पत्नी : काय हो, सगळ्या अंगाला असा रंग का फासून घेतला ?

पेंटर : अगं हल्ली मला बैचेन झाल्यासारखं वाटत होतं म्हणून काल डॉक्टरकडे गेलो, तेव्हा डॉक्टर म्हणाले, की तुम्ही तुमच्या कामात रंगून जा.

चॉकलेट पॅकिंग करण्याच्या दुकानातून जोर जोरात शिट्टीचा आवाज येत होता, हे पाहून शेजारचा अण्णा वैतागून दुकान मालकाकडे तक्रार घेऊन गेला.

अण्णा : तुमचा नोकर सारखा शिट्टी का वाजवतो ?

दुकानदार : मीच त्याला शिट्टी वाजवायला सांगितली आहे.

अण्णा : का ?

दुकानदार : शिट्टी चालू असली म्हणजे मला कळतं, की याच्या तोंडात चॉकलेट नाहीये म्हणून !

सनी : काही प्राणी १५-१५ दिवस न खाता राहतात. तरीसुध्दा ते जीवंत राहतात.
बंटी : अरे, मी सुध्दा न जेवता महिनाभर राहू शकतो.
सनी : ते कसे काय ?
बंटी : नाश्ता करुन

बाबा : बंड्या, आज पेपर होता ना मग परीक्षेला का गेला नाहीस ?
बंड्या : बाबा, पेपर खूपच कठीण होता.
बाबा : पण तुला हे कसं कळलं ?
बंड्या : अहो, दोन दिवसांपूर्वीच पेपर फुटला होता ना !

शिक्षक : बन्या, पाचासाते किती ?
बन्या : ३५
शिक्षक : शाब्बास, आता सातापाचे किती ?
बन्या : ५३

पिंकी : आई, पिवळा रंग खूप महाग असतो का ?
आई : नाही, एवढा काही महाग नसतो !
पिंकी : मग बाबा असं का म्हणाले, की ताईचे हात पिवळे करायचे आहेत, तीन-चार लाख रु. खर्च येणार आहे म्हणून ?

पाहुणे : गण्या, सांग पाहू वीस अधिक वीस किती ?
गण्या : चाळीस !
पाहुणे : शाब्बास ! हे घे चाळीस रुपयाचं तुला बक्षीस !
गण्या : अहो काका, तुम्ही बक्षीस देणार हे आधी का नाही सांगितलं ?
पाहुणे : का बरं बाळ ?
गण्या : मग मी ऐंशी असं उत्तर दिलं असतं ना !

सोनूचे वडील : काय मास्तर, आमच्या सोनूला नापास का केलंत ?
शिक्षक : अहो, मी सोनूला अगदी साधा प्रश्न विचारला होता, की माझ्याकडे पाच आंबे आहेत, त्यातले तीन आंबे तू खाल्लेस तर माझ्याकडे किती राहिले ? एवढं पण त्याला सांगता आलं नाही !
सोनूचे वडील : अच्छा, म्हणजे सोनूने तीन आंबे खाल्ले आणि तुम्हाला दोनच आंबे उरले म्हणून तुम्हाला राग आला होय ? मग आधी सांगायचं होतं ना ! अहो, चार डझन आंबे पाठवून दिले असते ना !







# जगण्याची दिशा मिळाली

स्वामीजी फ्रान्समध्ये असतानाचा प्रसंग आहे. फ्रान्समध्ये इमा काल्व्हे नावाची एक सुप्रसिध्द पॉप गायिका होती. तिला युरोप-अमेरिकेत खूप प्रसिध्दी मिळाली. तिच्याकडे अमाप पैसा होता. यश-कीर्ती सारं काही होतं; परंतु असं असूनही व्यक्तिगत जीवनात ती खूप दु:खी होती, कारण तिच्या एकुलत्या एक मुलीचा अपघाती मृत्यू झाला होता. मनाने ती पार कोलमडून गेली होती. त्यामुळे तिचा स्व:भावही अतिशय हट्टी आणि रागीट बनला होता. तिच्या मनाला शांती हवी होती पण ती मिळत नव्हती. काय करावे या विचाराने ती बैचेन होत असे. यापेक्षा हे जीवनच संपवलेले बरं असा विचार अनेकदा तिच्या मनात येई. तिच्या काही प्रेमळ मैत्रिणी होत्या. त्यांना तिचं दु:ख पाहवत नव्हतं. त्यांनी तिला स्वामीजींना भेटण्याचा सल्ला दिला; परंतु तिने मात्र स्पष्ट नकार दिला. या दु:खातून सुटका करण्यासाठी आत्महत्या हाच एकमेव मार्ग आहे अशी तिची ठाम समजूत बनली होती. त्यामुळे तिच्या मनात सतत आत्महत्या करण्याचे विचार घोळत असत. तसा तिने तीन-

चार वेळा प्रयत्नही केला; परंतु तो यशस्वी झाला नाही. शेवटी तिच्या मैत्रिणींनी तिला समजावून सांगत बळजबरीने स्वामीजींकडे नेलं.

पूर्णपणे निराश झालेली इमा कशीबशी स्वामीजींच्या कक्षात गेली. स्वामीजी आपल्या ध्यानात मग्न होते. त्यांची शांत आणि तेजस्वी मुद्रा पाहून इमा भान विसरुन त्यांच्याकडे पाहतच राहिली. त्यांच्या प्रथम दर्शनानेच मनाची बैचेन अवस्था हळूहळू कमी होऊ लागली असं तिला जाणवू लागलं. तिला शांतीचा अनुभव येऊ लागला. थोडा वेळ गेल्यानंतर स्वामीजी ध्यानस्थ अवस्थेतच तिला म्हणाले, "बेटा, तुला मन:शांतीची गरज आहे, तुझ्या मनामध्ये नकारात्मक विचारांनी गर्दी केली आहे; परंतु एक गोष्ट लक्षात ठेव, मनुष्यजन्म पुन:पुन्हा मिळत नाही. हे जीवन फार अनमोल आहे. ते अशा पध्दतीने संपवणं हा त्यावर उपाय नाही. धरतीवर जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मृत्यू हा येणारच आहे; या सत्याचा आपण स्वीकार केला पाहिजे. या जगात आपल्यापेक्षा कितीतरी जीव हे दु:खी आहेत, असहाय्य आहेत, पीडित आहेत; परंतु ईश्वराने बनवलेलं हे जग अतिशय सुंदर आहे. मनुष्य जीवन फार अल्प आहे. त्यामुळे प्रत्येक क्षण आनंदाने जग. ईश्वराने बनवलेली ही धरती, हा निसर्ग, प्राणी-पक्षी सारं काही सुंदर आहे. आपलं जीवन सुखमय व्हावं म्हणून ईश्वराने आपल्यासाठी चंद्र, सूर्य, हवा, पाणी, अन्न, निवारा इ. सुखसोयी निर्माण केल्या. याबद्दल आपण ईश्वराला धन्यवादच द्यायला हवेत. हे अल्प आयुष्य सुखमय करणं हे तुझ्याच हाती आहे."

स्वामीजींच्या या प्रेमळ आणि धीर देणाऱ्या शब्दांनी इमा अतिशय भारावून गेली. पुढे स्वामीजींनी तिच्या जीवनातील असे काही प्रसंग सांगितले, की ते ऐकून ती अवाकच झाली. स्वामीजींची आध्यात्मिक क्षेत्रातील योग्यता, त्यांचा तेजस्वीपणा या सर्वांचा तिच्यावर विलक्षण प्रभाव पडला. काही क्षणांच्या सहवासानेच तिला प्रचंड शांतीचा अनुभव येऊ लागला. स्वामीजींचा आशीर्वाद आणि नवीन उर्जा घेऊन ती आनंदाने घरी परतली.

स्वामीजींच्या क्षणभराच्या सहवासाने आणि आधार देणाऱ्या शब्दांनी तिच्यामध्ये अमूलाग्र बदल झाला. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली.

स्वामीजींनी अशा अनेक दु:खी जीवांना जगण्याचा मार्ग दाखवला.

❒ संग्राहक - सुकदेव पाटील

॥ साधना ॥

**टी.व्ही. वर**
**प्रत्येक मंगळवार व गुरुवार,**
**सकाळी ७.०० ते**
**७.३० वाजेपर्यंत**
**सद्‌गुरु माता सुदीक्षाजी महाराज**
**आणि बाबा हरदेवसिंहजी**
**महाराजांच्या**
**प्रवचनांचे प्रसारण**



# आशेचा दीपक

दरवर्षी पहिल्या क्रमांकाने पास होणाऱ्या राजूचा ह्यावर्षी पहिला नंबर हुकला म्हणून तो खूप उदास झाला होतो. पुढील वर्षी पहिला क्रमांक मिळवायचाच अशा तयारीने तो अभ्यास करु लागला; परंतु मध्ये अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे तो अधिकच नाराज होत होता.

एके दिवशी अभ्यास करत असताना अचानक आभाळ भरुन आलं. काही वेळातच धो-धो पाऊस कोसळू लागला. त्यातच वीज गेली. घरात संपूर्ण अंधार झाला. राजूच्या आईने तेल-वातीचे चार दिवे बनवून चार ठिकाणी ठेवले. राजू दिव्याच्या मंद प्रकाशात अभ्यास करता करता केव्हा झोपी गेला ते कळलेच नाही.

अचानक आश्चर्य घडलं. चारही दिवे आपापसात बोलू लागले. पहिला दिवा म्हणाला, “मित्रांनो! माझं नाव शांतता. जगामध्ये सर्वत्र शांतता नांदावी म्हणून मी सदैव तेवत असतो; परंतु स्वार्थी आणि मतलबी लोकांमुळे अशांती निर्माण होत आहे. इथं माझा काहीच उपयोग नाही म्हणून मी इथून जात आहे.” असे म्हणून तो दिवा विझून गेला.

त्याबरोबर दुसरा दिवा म्हणाला, “माझं नाव विश्वास. कुटुंबात, नात्यागोत्यामध्ये विश्वास निर्माण व्हावा म्हणून मी सातत्याने तेवत आहे; परंतु आज भावाभावात विश्वास राहिला नाही. त्यामुळे माझा

उर्वरित पान क्र. ४६ वर

# बहुगुणकारी डाळिंब



- डाळिंबाच्या दाण्यांचाच नव्हे तर साल, पाने, फुले, बिया, मुळं या सर्वच भागांचा औषधामध्ये वापर करतात. चला तर मग या बहुगुणकारी डाळिंबाचे फायदे जाणून घेऊ. डाळिंबामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह मोठ्या प्रमाणात असतात. चिरतारुण्य टिकवण्यासाठी रोज एक डाळिंबाचे सेवन करावे.
- अपचन, आम्लपित्त, ताप या कारणांनी जर तोंडास दुर्गंधी येत असेल तर डाळिंबाचे दाणे चावून चावून खाल्ल्यास दुर्गंधी निघून जाते.
- डाळिंबाच्या फुलात रुक्षता असते. ती रक्त वाहणे बंद करतात. रक्तप्रदरात याचा वापर केला जातो. जेथे रक्त थांबत नसेल तेथे या फुलाची पावडर टाकल्यास रक्त वाहणे बंद होते.
- जुलाब बंद करण्यासाठी हे अचूक औषध आहे. खोकल्यात डाळिंबाची साल तोंडात ठेवल्यास खोकला थांबतो. जुनाट खोकल्यासाठीही डाळिंब रामबाण आहे.
- एखाद्याला जास्त घाम येत असेल तर त्याने डाळिंबाची पाने घातलेल्या पाण्याने स्नान करावे. त्याचबरोबर ताप आला असेल तर डाळिंब खावे. तापामुळे शरीरामध्ये वाढलेली उष्णता त्यामुळे कमी होते.
- डाळिंब हे रक्तवर्धक आणि शक्तिवर्धक आहे. ज्यांना रक्ताची कमतरता म्हणजे ॲनिमिया आहे. त्यांनी रोज एक डाळिंब खावे. डाळिंब फुफ्फुसांच्या व्याधींसाठीही रामबाण आहे. फुफ्फुसातून रक्त येत असेल तर डाळिंब ते थांबवते. डाळिंब रक्त घट्ट करते. **ब्लड कोलेस्ट्रॉलमध्ये डाळिंब देऊ नये.**
- हृदय बळकट करण्यासाठी डाळिंबाच्या रसात केशर, लाल गूळ व वेलची घालून त्याचे सरबत करावे व रोज थोडे थोडे प्यावे. यामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यातील अडथळा दूर होऊन रक्ताभिसरण क्रिया सुधारते.
- डाळिंब सोलल्यानंतर त्याचे दाणे लगेचच खाणे आवश्यक आहे. कारण दाणे उशिरा खाल्ल्यानंतर त्यातील पोषक घटकांचे प्रमाण कमी होते. त्याचप्रमाणे स्वाद व चवही कमी होते. आयुर्वेदात डाळिंबाला रसायन मानतात!

❑❑❑

# निसर्गाची शिकवण

हिरवा शालू लेवून धरती, नवचैतन्याने बहरते
दु:ख, निराशा झटकून, जगण्याची कला शिकवते

पानगळती सांगून जाते, थांबू नकोस तू कुठे
सुकलेल्या ओंडक्यालाही, आशेची पालवी फुटे

जगण्याची ही उमेद, सदा निसर्गातून मिळते
तुफानात ही तग धरावे, त्या लव्हाळ्यासही कळते

जगण्यासाठी धडपडताना, पिंपळ मला दिसला
दगडातूनही फुलताना, आनंदून तो हसला

इवल्याशा चोचीने विणते, सुगरण आपले घरटे
कल्पनाशक्ती अजब मोठी, कुठेही नसे वोखटे

कामात सदा व्यस्त राहा, मुंग्यांकडून शिकावे
प्रयत्न करुन कसोशीने, पर्वतही चढून जावे

निसर्ग शिक्षक शिकवितो, जगण्याचा मार्ग नवा
छोट्या छोट्या गोष्टीतून, मुलांनो, बोध घ्यायला हवा

कविता - सौ. वासंती भोसले (सांगली)

# डोळे उघडून बघा

डोळे उघडून बघा गड्यांनो, झापड लावू नका
जे दिसते ते असेच का हे उलगडण्याला शिका ।।ध्रृ।।

भोवतालीचे विश्व कोणत्या सूत्राने चाले
कोण बोलतो राजा आणिक कुठले दळ हाले
प्रारंभी जे अद्‌भूत वाटे गहन भितीदायी
त्या विश्वाचा स्वभाव कळता भय उरले नाही
या जगताचे मर्म न कळता जगणे केवळ फुका
जे दिसते ते असेच का हे उलगडण्याला शिका ।।१।।

वाहून गेलेल्या पाण्याचा ढग बनतो तो कसा ?
बीज पेरता कसे उगवते पाऊस येतो कसा ?
चारा चरुनी शेण होतसे शेणाचे खत पिका
पीक पेरता फिरुनी चारा चक्र कसे हे शिका
जीवचक्र हे फिरे निरंतर एवढे विसरु नका
जे दिसते ते असेच का हे उलगडण्याला शिका ।।२।।

अनुरेणूंची अगाध दुनिया दृष्टीच्या पार
सूक्ष्मजीव अदृश्य किरणही भवती फिरणार
या सर्वांच्या आरपार जी मुक्तपणे विहरे
बुध्दी मानवी स्थिरचर सारे विश्व वेधुनी उरे
विज्ञानाची दृष्टी वापरा स्पर्धेमध्ये टीका
जे दिसते ते असेच का हे उलगडण्याला शिका ।।३।।

- साभार - मराठी विज्ञान परिषद, पुणे विभाग



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







मी तर बाहेर जात आहे. मला फारच गरम होत आहे. बाय! आई मी जाते.
मी एखाद्या स्वीमिंग पुलाजवळ जाऊ का ? तिथे पाणी देखील असेल आणि गारवा देखील
अरे इथे तर फारच छान वाटतंय! मी सोनी, रोहन आणि चिंटूला पण बोलवून घेते. मी आत्ताच त्यांना फोन करते.



तुम्ही सारे स्वीमिंग पूलजवळ येणार आहात का ? इथे फारच गारवा आहे.
हो ! आम्ही सारे तिथं येत आहोत. आपण सर्वजणं मिळून भरपूर मज्जा करु या आणि सुट्टीचा आनंद घेऊ या.
किट्टी, आम्ही सर्वजण आलो.
अरे ! खरोखर, इथे तर फारच छान वाटतंय.
आपण सर्वजण मिळून बॉल खेळू या ?
हो, हो, का नाही


अरे, बॉल तर पाण्यात गेला. आता कसा काढणार ?
अरे, घाबरु नका. मला पोहायला येतं. मी काढून आणते.
हे घ्या, आला बॉल
अरे व्वा! किट्टी तू तर फारच हुशार आहेस.
ह्यात हुशारपणा कसला? वेळेवर आपल्याला सगळी कामं आली पाहिजेत. कधीही आपल्याला कोणत्याही कामाची गरज भासू शकते.
आता आम्हीदेखील सर्वजण पोहायला शिकणार
हो, हो, का नाही ?
काय तुम्ही सर्वजण थंड पेय पिणार ?
किट्टी! आज खरोखरच खूप आनंद आला. आपण सर्वजण उन्हाळ्यात एवढी मौज-मज्जा करु शकतो हा विचार देखील केला नव्हता.

# शांतीकालीन विशिष्ट सेवा पदक

**परम विशिष्ट सेवा पदक :-** परम विशिष्ट सेवा पदक भारत सरकारचा एक सैन्य पुरस्कार आहे.



त्याची सुरुवात१९६० मध्ये केली गेली होती. तेव्हापासून आजपर्यंत हा शांतीसाठी आणि सेवा क्षेत्रांमधील असाधारण कार्यासाठी (मरणोपरांत) देण्यात येतो. भारतीय सशस्त्र बलासहित सर्व रँक तसेच प्रादेशिक सेना, सहाय्यक आणि रिझर्व बल, नर्सिंग अधिकारी व इतर संघटित सशस्त्र बल पथके या पदकांसाठी पात्र समजले जातात.



**अतिविशिष्ट सेवा पदक :-** सशस्त्र बलाच्या सर्व रँकसाठी भारत सरकारचा हा शांतीकालीन सैन्य पुरस्कार आहे. हा पुरस्कार मरणोपरांत देखील प्रदान केला जातो. एकापेक्षा अधिक वेळा हा पुरस्कार प्राप्त केल्यास पदकासोबत एक बार (पट्टी) जोडण्यात येते. याची सुरुवात २६ जानेवारी १९६० रोजी करण्यात आली.



**विशिष्ट सेवा पदक :-** विशिष्ट सेवा पदक भारत सरकारद्वारा सशस्त्र बलाच्या सर्व रँकमधील कर्मचाऱ्यांना शांती समयी विशिष्ट आदेशानुसार केल्या जाणाऱ्या व साधारण सेवेसाठी दिला जाणारा सन्मान आहे. हा सन्मान मरणोपरांत देखील प्रदान केला जातो. आणि एकापेक्षा अधिक वेळा एकाच व्यक्तीने हा सन्मान मिळविल्यास रिबनवर बार (पट्टी) ने निर्देशित केले जाते. याची सुरुवात २६ जानेवारी १९६० रोजी करण्यात आली.

# युध्दकालीन विशिष्ट सेवा पदक



**सर्वोत्तम युध्द सेवा पदक :-** सर्वोत्तम युध्द सेवा पदक युध्दकाळातील सर्वात प्रतिष्ठित सैन्य सन्मान आहे. प्रत्यक्ष युध्दाच्या वेळी किंवा युध्द संघर्ष प्रसंगी असाधारण शौर्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार परम विशिष्ट सेवा पदकाच्या समतुल्य समजला जातो.



**उत्तम युध्द सेवा पदक :-** उत्तम युध्द सेवा पदक युध्दकाळातील उल्लेखनीय सेवेसाठी भारत सरकारद्वारा दिला जाणारा एक सैन्य सन्मान आहे. हा पुरस्कार परिचालन संबंधी उच्चस्तरीय विशिष्ट सेवेसाठी प्रदान करण्यात येतो. प्रत्यक्ष युध्द आणि संघर्षपूर्ण प्रसंग यांचा समावेश होतो. हा सन्मान अतिविशिष्ट सेवा पदकाच्या समतुल्य समजला जातो. हा सन्मान मरणोपरांत देखील प्रदान करण्यात येतो.

**युध्द सेवा पदक :-** युध्द सेवा पदक युध्दकालीन समयी निभावलेल्या प्रतिष्ठित सेवेकरिता भारत सरकारद्वारा दिला जाणारा सैन्य पुरस्कार आहे. हा पुरस्कार प्रत्यक्ष युध्द अथवा संघर्षपूर्ण परिस्थिती निभावलेल्या सेवेकरिता दिला जातो. या पुरस्काराच्या प्राप्तकर्त्यास मरणोपरांत देखील सन्मानित केले जाते.



**पोलीस पदक :-** कायदेशीर अधिकारी आणि पोलीस यांच्या असाधारण शौर्यासाठी भारत सरकारद्वारा पोलीस पदक हा पुरस्कार प्रदान केला जातो. या पुरस्कारासाठी रँक आणि त्यांच्या सेवेचा काळ यांचा विचार केला जातो. या पुरस्काराची सुरुवात १ मार्च १९५१ रोजी करण्यात आली. स्वातंत्र्य दिनादिवशी आणि प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी या पुरस्कारांचे वितरण केले जाते.

- संग्राहक - नीलेश माने (अंबरनाथ)

## झाकली मूठ सव्वा लाखाची ! (पान २४ वरुन)

"चिंता करु नकोस. लालसेपोटी तू कर्ज काढलंस खरं, पण आता मी सांगतो तसं तू कर."

प्रधानाने सांगितल्याप्रमाणे पुजाऱ्याने मंदिराच्या परिसरात लोकांना गोळा केले आणि सांगितले, "लोकहो, राजाने या मंदिरात येऊन देवाची पूजा केली आणि देवाला एक वस्तू अर्पण केली. ती माझ्या मुठीत आहे. ही वस्तू मंदिरात ठेवणं शक्य नाही. त्यामुळे या वस्तूचा लिलाव करायचा आहे. तरी आपण बोली लावावी."

लोकांनी विचार केला, की राजाने देवाला अर्पण केलेली वस्तू निश्चितच अमूल्य असणार. त्यामुळे तिची बोली मोठ्या रकमेची लावावी लागणार. पहिली बोली लागली - शंभर मोहरा, दुसरी बोली पाचशे मोहरा, तिसरी बोली एक हजार मोहरा. असे करता करता पन्नास हजार मोहरांपर्यंत बोली लागली.

लिलावाची ही गोष्ट राजाच्या कानावर गेली. राजाला आठवलं, की आपण तर फक्त दोनच नाणी देवापुढे ठेवली होती आणि त्याचा लिलाव होतोय? लोकांना जर कळलं, की आपण फक्त दोनच नाणी भेट केलेली आहेत तर प्रजेसमोर आपली काय इभ्रत राहील? तो तडक घोड्यावर बसून मंदिराजवळ आला आणि धावतच पुजाऱ्याकडे जात म्हणाला, "पंडितजी, अहो मी तुम्हाला सव्वा लाख मोहरा देतो पण ती वस्तू कोणाला दाखवू नका." पुजाऱ्याने मुठीत ठेवलेली दोन नाणी गुपचूप राजाकडे सोपवली.

तेव्हापासून म्हण प्रचलित झाली - झाकली मूठ सव्वा लाखाची!

❐❐❐

## बाबाजींचे सुपुत्र बनून राहू या

संत समागमाचा दिवस होता. बाबा गुरबचनसिंहजी महाराज आपल्या तंबूमध्ये विश्रांती घेत होते. त्यावेळी बाबा हरदेवसिंहजी दहा-बारा वर्षांचे होते. ते बाबा गुरबचन-सिंहजींना भेटण्यासाठी तंबूमध्ये प्रवेश करत असताना गेटवर असलेल्या सेवादलने त्यांना अडवले. त्यावेळी बाबा हरदेवसिंहजी काहीही न बोलता बाजूला मुकाट्याने उभे राहिले. थोड्या वेळाने सेवादल अधिकारी आले त्यांनी गेटवर असलेल्या सेवादलाला विचारले," तुम्ही यांना इथं का उभं केलंत? यांना तुम्ही ओळखत नाही का? हे बाबाजींचे सुपुत्र आहेत." त्यावर सेवादल पटकन म्हणाले, "आम्हीपण बाबाजींचे पुत्र आहोत."

सेवादल अधिकारी त्या सेवादलला समजावत म्हणाले, "तुम्ही जर बाबाजींचे सुपुत्र असता तर यांच्यासारखे गप्प उभे राहिले असता. तुम्हाला स्वतःच्या तोंडाने सांगण्याची गरज भासली नसती. आपल्याला प्रत्येक क्षणी बाबाजींचे सुपुत्र बनून राहायचे आहे आणि ते आपल्या कर्माने ते सिद्ध करायचे आहे."

- विवेक 'शौक'जी
(विचारातून)



# अंटार्क्टिका

हे पृथ्वीवरील दक्षिण ध्रुवाभोवतीचे हिमाच्छदित व पर्यावरण प्रदूषणमुक्त खंड आहे. या खंडाचे क्षेत्रफळ १,४२,००,००० चौ. किमी. आहे. याचा ९८% भाग हिमाच्छिदत असून हिमस्तराची सरासरी जाडी सुमारे १,६०० मी. आहे. पृथ्वीवरील एकूण गोड्या जलसंसाधानापैकी ७०% पाण्याचा साठा अंटार्क्टिवर हिमरुपात आहे.

अंटार्क्टिाचे हवामान जगातील इतर प्रदेशांच्या तुलनेत सजीवांसाठी अत्यंत प्रतिकूल मानले जाते. त्यामुळे हे कायमस्वरुपी मानवी वस्ती नसलेले एकमेव खंड आहे. या खंडावरील तापमान अत्यंत कमी असून जगातील सर्वात कमी तापमान ८९०से. पूर्व मध्य अंटार्क्टिका भागातील बोस्टोक येथे २१ जुलै १९८३ रोजी नोंदले गेले आहे. अतिथंड हवामान, अत्यंत कमी वृष्टी बहुतांश हिमाच्छादित भाग यामुळे या खंडाचा अंतर्भाग ओसाड आहे. येथे अंटार्क्टिक हेअर ग्रास आणि अंटार्क्टीक पर्लवोर्ट या दोन प्रकारच्या सपुष्प वनस्पती वाढतात. याशिवाय तेथे हरिता (मॉस) आणि यकृतका (लिव्हरवर्टस्) या शेवाळी वनस्पती विशेषतः आढळतात. डास व चिलटे हे येथील मुख्य प्राणी आहेत.

अंटार्क्टिक महासागरालगतच्या खंडाचा भाग पृथ्वीवरील एक अतिशय सधन परिसंस्थेचा भाग म्हणून ओळखला जातो. या वैशिष्टयपूर्ण परिसंस्थेत विविध प्रकारचे सागरी जीव वाढतात. त्यात क्रील, माखली यांसारख्या अपृष्ठवंशी लहान कवचधारी प्राण्यांपासून ते पेंग्विन, सील, देवमासा इ. मोठ्या पृष्ठवंशी प्राण्यांसारख्या सजीवांचा समावेश आहे. क्रील हा अंटार्क्टिका अन्नसाखळीचा आधार घटक आहे. अंटार्क्टिका खंड खनिज संसाधनांच्या दृष्टीने अतिशय सधन आहे. तेथे क्रोमियम, तांबे, खनिज तेल, दगडी कोळसा या खनिजांचे मोठे साठे आहेत.

इ.स. १९५९ च्या अंटार्क्टिका करारानुसार अंटार्क्टिका हा आंतरराष्ट्रीय भूप्रदेश म्हणून ओळखला जातो. या करारातील अटीनुसार या खंडावरील संसाधनाचा उपयोग जागतिक शांततेसाठी केला जाईल. तसेच या भूप्रदेशावर कोणत्याही देशाचा हक्क किंवा अधिकार राहणार नाही. याशिवाय अंटार्क्टिकावरील संसाधने शाश्वत राहावीत व पर्यावरण प्रदूषणमुक्त राहावे अशी जगातील पर्यावरणाची मागणी आहे.

अलीकडील काळात पर्यटनाच्या विकासामुळे अंटार्क्टिकाच्या पर्यावरणावर परिणाम होत आहे. दरवर्षी सुमारे ३००० प्रवासी जहाजे अंटार्क्टिकाभोवतीच्या महासागरात प्रवेश करतात. त्यामुळे पेंग्विनच्या जीवनमानात व्यत्यय येत आहे. तापमान वाढीमुळे अंटार्क्टिकावरील बर्फ वितळले जात आहे.

भारत सरकारने १९८१ सालापासून अंटार्क्टिका संशोधन हा एक प्रमुख राष्ट्रीय

कार्यक्रम हाती घेतला आहे. भारतीय संशोधकांनी २०२० पर्यंत ३८ मोहिमा पूर्ण केलेल्या आहेत. पहिल्या मोहिमेचे नेतृत्व डॉक्टर एस. झेड. कासीम यांनी केले होते आणि त्या ठिकाणी १९८३ मध्ये भारताचे पहिले स्थायी संशोधन केंद्र 'दक्षिण गंगोत्री' उभारले गेले होते. हे केंद्र १९८९ पर्यंत कार्यरत होते. तद्नंतर पूर्व अंटार्क्टिकातील मध्यभूमीत 'मैत्री' हे भारतीय स्थानक उभारले आहे. या मोहिमेअंतर्गत राष्ट्रीय प्रयोगशाळा, संशोधन संस्था, विद्यापीठे, सर्वेक्षण विभाग अशा अनेक संस्थातील तज्ज्ञांना संशोधनासाठी निमंत्रित करण्यात येते. भारत सरकारतर्फे २०१२ साली 'भारती' नावाचे नवीन संशोधन केंद्र उभारण्यात आले आहे. या मोहिमात महाराष्ट्रातील अनेक संशोधकांचा मोलाचा सहभाग आहे. राष्ट्रीय अंटार्क्टिक व महासागरी संशोधन केंद्र नॅशनल सेंटर फॉर अंटार्क्टिक अँड ओशन रिसर्च, पणजी (गोवा) येथे आहे. भारतीय संशोधक अंटार्क्टिकाच्या सरोवरातील जीवसृष्टीचा, तेथील जैवविविधतेचा, सजीवांवरील ध्वनीप्रक्रियेच्या परिणामांचा आणि सजीवांच्या अवशेषांचा अभ्यास करीत आहोत. तसेच हवेचे प्रवाह, हिमभेगा, समुद्र-बर्फ-महासागर-वातावरण यातील आंतरक्रिया यासबंधी अभ्यास करीत आहोत.

भारताखेरीज जगातील अनेक प्रमुख राष्ट्रांची संशोधन केंद्रे अंटार्क्टिकावर आहेत. एका वेळेस साधारण ४००० शास्त्रज्ञ तेथे काम करीत असतात. हरितगृह वायू परिणामाच्या मापनासाठी अंटार्क्टिका हे प्रमुख केद्र आहे.

❑❑❑

# आशेचा दीपक

(पान ३४ वरुन)

असण्याचा काहीच उपयोग नाही. त्यापेक्षा इथून गेलेलंच बरं." असं म्हणून तोही दिवा विझून गेला.

नंतर तिसरा मध्यभागी असलेला दिवा म्हणाला, "माझं नाव प्रेम. जगात जर प्रेम असेल तर विश्वास वाढतो आणि विश्वास असेल तरच शांतता नांदते; परंतु आज जगामध्ये प्रेमच उरलं नाही. त्यामुळे माझ्या तेवत राहण्यालाही काही अर्थ राहिला नाही. म्हणून मी देखील तुमचा निरोप घेत आहे."

आता मात्र एकच छोटा मिणमिणता दिवा तेवत राहिला. अंधार आणखी वाढला. राजू खूपच घाबरला; परंतु त्याला धीर देत छोटा दिवा म्हणाला, "बाळ! घाबरु नकोस. मी विझणार नाही आणि तुला सोडूनही जाणार नाही. माझं नाव आहे आशा म्हणजे उमेद! मी तर तुझ्या हृदयात राहतो. शांतता, प्रेम, विश्वास जरी निघून गेले तरी मी शेवटपर्यंत तग धरुन राहतो. उदास झालेल्या मनाला नवी उमेद देतो. निराश झालेल्या मनाला उभारी देतो. त्या जोरावर प्रेम, विश्वास, शांतता जीवनात पुन्हा आणता येतात." असे म्हणून त्याने आपल्या ज्योतीने तिघांना पुन्हा प्रज्ज्वलीत केले.

राजूला खूप आनंद झाला. तो झोपेतून जागा झाला. त्याला दिव्याची ती शिकवण आठवली आणि तो पुन्हा नव्या उमेदीने अभ्यासाला लागला.

❑❑❑



# महाराष्ट्रातील पहिले

**योग्य पर्याय निवडा**

१) महाराष्ट्रातील पहिले पक्षी अभयारण्य - ताडोबा / कर्नाळा (रायगड)

२) महाराष्ट्रातील पहिला अणुविद्युत प्रकल्प - तारापूर (ठाणे) / ट्रॉम्बे

३) महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ - मुंबई / पुणे

४) महाराष्ट्रातील पहिले जलविद्युत केंद्र - कोयनानगर / खोपोली (रायगड)

५) महाराष्ट्रातील पहिले मातीचे धरण - गंगापूर / नाथसागर

६) महाराष्ट्रातील पहिला पवन विद्युत प्रकल्प - सातारा / जामसंडे (देवगड)

७) महाराष्ट्रातील पहिला लोह प्रकल्प - चंद्रपूर / नागपूर

८) महाराष्ट्रातील मराठी भाषेतील पहिले साप्ताहिक - दर्पण / साधना

९) महाराष्ट्रातील पहिली कापड गिरणी - मुंबई / इचलकरंजी

१०) महाराष्ट्रातील पहिले फाईव्ह स्टार हॉटेल - ताजमहाल (मुंबई) / ओबेरॉय

११) महाराष्ट्रातील कृत्रिम पावसाचा पहिला प्रयोग - वडूज (सातारा) / सांगली

१२) महाराष्ट्रातील पहिला पर्यटन जिल्हा - अहमदनगर / सिंधुदुर्ग

१३) महाराष्ट्रातील पहिली सैनिकी शाळा - सातारा / खडकी (पुणे)

१४) महाराष्ट्रातील पहिला साक्षर जिल्हा - मुंबई / सिंधुदुर्ग

१५) महाराष्ट्रातील पहिले दैनिक वृत्तपत्र - ज्ञानप्रकाश / लोकसत्ता

उत्तरे इतरत्र

# १०/१२ नंतर प्रवेश घेतांना लागणारे दाखले

| दाखले / प्रमाणपत्र | दाखले / प्रमाणपत्र मिळवण्यासाठी - अर्हता | दाखले / प्रमाणपत्र - प्राप्त कसे कराल |
|---|---|---|
| वय, राष्ट्रीयत्व, अधिवासाचा दाखला | जन्मापासून महाराष्ट्रातील रहिवास किंवा गेल्या १५ वर्षांपसून राज्यातील रहिवासी असावे.<br>ओळखीचा पुरावा : पॅनकार्ड / आधार कार्ड इ.<br>पत्त्याचा पुरावा : रेशन कार्ड / आधार कार्ड इ.<br>रहिवास पुरावा : तलाठी / ग्रामसेवक द्वारे निवासी पुरावा आवश्यक आहे.<br>वयाचा पुरावा : जन्म प्रमाणपत्र / बोनाफाइड प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला<br>अर्जदाराकडून स्वतःची घोषणा | https://aaplesarkar.mahaonline.gov.in किंवा संबंधित तहसीलदार कार्यालयातून अथवा महा ई सेवा केंद्रात ही सेवा ऑनलाईन उपलब्ध आहे. |
| जातीचा दाखला | तलाठी रहिवासी दाखला<br>शाळा सोडल्याचा दाखला / बोनाफाइड प्रमाणपत्र / जर अर्जदार अशिक्षित असेल तर मुलाचे-मुलीचे शाळेचा दाखला, प्राथमिक शाळेचा प्रवेश निर्गम उतारा<br>वडील / चुलते, आत्या / आजोबा यांची जात नमूद असलेला शाळा सोडल्याचा दाखला<br>रेशनकार्ड झेरॉक्स<br>आधार कार्ड इ. | https://aaplesarkar.mahaonline.gov.in किंवा संबंधित तहसीलदार कार्यालयातून अथवा महा ई सेवा केंद्रात ही सेवा ऑनलाईन उपलब्ध आहे |
| जात वैधता प्रमाणपत्र | जातीचा दाखला Caste Certificate<br>अर्जदाराचा आणि त्याच्या वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला<br>वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला (वडील नसल्यास काका/आत्या यांचा वरील प्रमाणे पुरावा)<br>आजोबांचा शाळा सोडल्याचा दाखला, आजोबा शाळा शिकलेले नसल्यास किंवा शाळेचा दाखला नसेल तर इतर पुरावा जोडणे<br>आजोबा जिवंत नसल्यास मृत्यू दाखला.<br>कुटुंबाचे वंशावळ (१०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर)<br>नातलगांची Validity Certificate असल्यास झेरॉक्स (वडील/भाऊ/बहिण/काका/आत्या)<br>शैक्षणिक कामासाठी - नमुना ३, १८, १९ / नियुक्ती पत्र<br>अर्जदार इयत्ता बारावीत असल्यास बोनाफाईड जोडणे आवश्यक<br>अर्जदार उच्च शिक्षणाकरिता पात्र असेल तर प्रवेश पावती जोडणे | जिल्हा निहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे आवश्यक कागदपत्रे जोडून अर्ज करावा लागतो. किंवा https://etribevalidity.mahaonline.gov.in आणि https://bartievalidity.mahaonline.gov.in या वेबसाईटच्या माध्यमातून online पध्दतीने Apply करता येते. |

| | | |
|---|---|---|
| उत्पन्नाचा दाखला | ओळखीचा पुरावा : पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड इ. यापैकी एक आणि अर्जदाराचा फोटो<br>रहिवास पुरावा : पासपोर्ट, आधार कार्ड, मतदान कार्ड इ. यापैकी एक कागदपत्र<br>स्वयंघोषणापत्र : उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी स्वयं घोषणापत्र भरुन द्यावे लागते. हे सर्वांसाठी अनिवार्य असून अर्जासोबत भरुन द्यावं लागतं<br>उत्तपन्न दाखवणारी कागदपत्र : प्राप्तिकर परतावा भरल्याचं प्रमाणपत्र, मंडळ अधिकाऱ्याचा तपासणी अहवाल, नोकरदारासाठी फॉर्म नंबर १६, निवृत्त पेन्शनधारकांसाठी बँक प्रमाणपत्र<br>अर्जदार शेतकरी असल्यास ७/१२ आणि ८ अ चा उतारा, बँकेच्या बचत खात्याचा तपशील Statement | https://aaplesarkar.mahaonline.gov.in किंवा संबंधित तहसीलदार कार्यालयातून अथवा महा ई सेवा केंद्रात ही सेवा ऑनलाईन उपलब्ध आहे |
| नॉनक्रीमिलेयर दाखला | आई / वडिलांचा मा. तहसीलदार कार्यालयातील मागील तीन वर्षांचा उत्पन्नाचा दाखला<br>जातीचा दाखला<br>शाळा सोडल्याचा दाखला<br>तलाठी रहिवासी दाखला<br>रेशनकार्ड झेरॉक्स प्रत<br>रिन्यू करावयाचे असल्यास एक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला | https://aaplesarkar.mahaonline.gov.in किंवा संबंधित तहसीलदार कार्यालयातून अथवा महा ई सेवा केंद्रात ही सेवा ऑनलाईन उपलब्ध आहे |
| आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र | लाभार्थी व त्याच्या वडिलांचे आधारकार्ड<br>लाभार्थी व त्याच्या वडिलांची टी.सी. TC / निर्गम उतारा<br>रेशनकार्ड झेरॉक्स प्रत / रहिवाशी प्रमाणपत्र<br>उत्पन्नाचा पुरावा (सातबारा, ८अ/ फॉर्म १६/ आयकर भरल्याचा पुरावा)<br>अर्जदार किंवा त्याचे कुटुंबातील सदस्य १३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्या आधीचे महाराष्ट्राचे रहिवाशी असल्या बाबतचा पुरावा<br>स्वघोषणा पत्र<br>विहित नमुन्यातील अर्ज आणि ३ पासपोर्ट फोटो | https://aaplesarkar.mahaonline.gov.in किंवा संबंधित तहसीलदार कार्यालयातून अथवा महा ई सेवा केंद्रात ही सेवा ऑनलाईन उपलब्ध आहे |

- **ओळखीचा पुरावा :** पॅनकार्ड/ पासपोर्ट/ आरएसबीवाय कार्ड/ आधार कार्ड/ मतदार ओळखपत्र/ मनरेगा जॉब कार्ड/ ड्रायव्हिंग लायसन्स/ अर्जदार ओळखपत्र/ शासकीय किंवा निमशासकीय संस्थांकडून दिलेला ओळखपत्र यापैकी कुठलेही एक

- **पत्त्याचा पुरावा :** पासपोर्ट/ पाण्याचे बिल/ रेशन कार्ड/ आधार कार्ड/ मतदार ओळखपत्र/ दूरध्वनी बिल/ ड्रायव्हिंग लायसन्स/ वीज बील/ मालमत्ता कराची पावती/ ७/१२ आणि ८अ/ भाडे भाड्याचे अर्क यापैकी कुठलेही एक

# रंग भरा





जागतिक पर्यावरण दिन

## शब्दकोडे

## २१९चे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ दी | २ र | | ३ सिं | धु | ४ दु | र्ग |
| | ५ वि | वा | ह | | र्यो | |
| | वा | | ६ ग | दा | ध | र |
| ७ झा | र | खं | ड | | न | |
| की | | | | ८ क | | ९ जि |
| १० र | ११ स | गु | ल्ला | | १२ रो | जा |
| | त | | | १३ कां | | बा |
| १४ मो | रा | र | जी | दे | सा | ई |

### सामान्यज्ञान उत्तरे

१) कर्नाळा
२) तारापूर
३) मुंबई
४) खोपोली
५) गंगापूर
६) जामसंडे
७) चंद्रपूर
८) दर्पण
९) मुंबई
१०) ताजमहाल
११) वडूज
१२) सिंधुदुर्ग
१३) सातारा
१४) सिंधुदुर्ग
१५) ज्ञानप्रकाश

॥ तू ही निरंकार ॥

पूर्ण सद्गुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी। पूर्ण सद्गुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी।
पूर्ण सद्गुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी। पूर्ण सद्गुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी।
पूर्ण सद्गुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी। पूर्ण सद्गुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी।



शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा। घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है। ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा। गुरू की जैं जैं जो करता है उसकी होती जैं जैं कार।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा। गुरू की पूजा जो करता है उसको पूजे कुल संसार।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month


॥ तुही निरंकार ॥



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील
अंचित रा. पाटील

राकेश ज. पाटील
कुशल रा. पाटील